शब्दांना सत्याची धार

प्रहार

संगमेश्वर सोनवी पूल परिसरात वाहतूक कोंडीने प्रवासी हैराण

पान ३

वाशिष्ठी नदीत गाळ उपशाला सुरुवात

पान ८

रत्नागिरी ● शुक्रवार १२ डिसेंबर, २०२५ | RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० ● वर्ष २२ ● अंक ३४ ● पाने ८ ● ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in

सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानंतरच जिल्हा परिषदेच्या निवडणुका; ५० टक्के आरक्षणाची मर्यादा राखून निवडणुका घेण्याचे आदेश

२० जिल्हा परिषदा, ८८ पंचायत समित्यांच्या निवडणुकांना होणार विलंब

१२ जिल्हा परिषद, १२५ पंचायत समित्यांमध्ये लवकरच निवडणूक

नागपूर, चंद्रपूरमध्ये वाढीव आरक्षणासह निवडणूक

मर्यादा ओलांडणाऱ्या जि.प. व पं.स.मध्ये निकालानंतर नव्याने आरक्षण

मुंबई (प्रतिनिधी)

राज्यातील नगर परिषद, नगर पालिका निवडणुका पार पडल्यानंतर आता जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महापालिका निवडणुकांचे वेध लागले आहेत. या मिनी विधानसभा निवडणूक ठरणार असल्याने या निवडणुकीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा राखून निवडणुका घेण्याचे स्पष्ट आदेश दिले असल्याने २० जिल्हा परिषदा (ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, हिंगोली, नांदेड, अमरावती, अकोला, वाशीम, बुलडाणा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली आणि पंचायत समितीमध्ये ५० टक्क्यांच्या वर आरक्षण गेल्याने अहिल्यानगर, जालना, बीड या तीन जिल्हा परिषदा), तसेच ८८ पंचायत समित्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाचा पुढील निकाल येईपर्यंत निवडणुका न घेण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे.

याबाबत माहिती देताना राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी सांगितले की, ५० टक्क्यांच्या वर जिथे आरक्षण गेले आहे. त्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिल्यानंतरच निवडणुका घेतल्या जाणार आहेत. नागपूर आणि चंद्रपूर या महानगरपालिकांत ५० टक्क्यांच्या वर आरक्षण असले तरी या दोन ठिकाणी निवडणूक वाढीव आरक्षणासह घेता येईल, असे न्यायालयाच्या निर्णयात स्पष्ट आहे. त्यामुळे सर्व महापालिका निवडणुका एकत्रित घेतल्या जाणार आहेत. शिवाय ही निवडणूक न्यायालयीन निर्णयाच्या अधिन असणार असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

राज्य निवडणूक आयोग १२ जिल्हा परिषदांमध्येच लवकरच निवडणुका घेणार आहेत. पन्नास टक्क्यांच्या आत जिथे आरक्षण आहे, त्याच ठिकाणच्या निवडणुका घेतल्या जातील. जिथे ५० टक्के आरक्षणाची टक्क्यांची मर्यादा ओलांडली आहे, त्यासाठी इतक्यात नव्याने आरक्षणाची सोडत न काढता न्यायालयाच्या पुढील निर्णयाची वाट पाहिली जाईल, असे वाघमारे यांनी स्पष्ट केले. आरक्षण मर्यादेत असणाऱ्या १२ जिल्हा परिषदांमध्ये रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या जिल्हा परिषदांचा समावेश आहे. तसेच या जिल्ह्यांमधील १२५ पंचायत

(पान २ वर)

निवडणूक आयोगाची सावध पावले

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आयोगाने आधी तीन टप्प्यांत मतदानाची रूपरेषा तयार केली होती. या नियोजनानुसार, पहिल्या टप्प्यात नगर परिषद-नगर पालिकांच्या निवडणुका झाल्या. तर, दुसऱ्या टप्प्यात ३२ जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत पंचायत समित्या, तिसऱ्या टप्प्यात २९ महापालिकांच्या निवडणुका घेण्याची तयारी करण्यात आली होती. मात्र, ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायालयात पोहोचल्यानंतर परिस्थिती बदलली.

(पान २ वर)



विधानभवनातून

मुख्यमंत्र्यांचा महायुतीला ब्रेकफास्ट...!

● संतोष वायंगणकर

नागपूर विधीमंडळ अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीतील घटकपक्ष असलेल्या आमदारांसाठी मुख्यमंत्री निवासस्थानी ब्रेकफास्टचे आयोजन केले होते. आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, आणि महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील आमदारांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ब्रेकफास्टसाठी निमंत्रित करून पार पडलेल्या नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीत स्वतंत्र निवडणुका लढविल्या गेल्याने ताणले गेलेले संबध या ब्रेकफास्ट निमित्ताने सुरळीत करण्याचे प्रयत्न केले. महायुतीतील सर्व घटकपक्ष अधिक जवळ येतील असे प्रयत्न त्यांच्याकडून झाले.

लवकरच होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकांना सामोरे जाताना महायुतीच्या माध्यमातूनच निवडणुका लढविल्या जाण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे तशी चर्चाही विधीमंडळाच्या प्रांगणात होत होती. आज विधानसभेत महसूल अधिनियमातील करण्यात येत असलेल्या बदलाच्या विधेयकावर चर्चा झाली. या चर्चेत अनेक सदस्यांनी सहभाग घेतला. यावेळच्या अधिवेशनात महाविकास आघाडी म्हणजे विरोधी पक्ष कुठे दिसतही नव्हता. सरकारला अडचणीत आणणे सोडाच परंतू काही महत्त्वाच्या आणि जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करणे अपेक्षित होते. पण तसा प्रयत्नही विरोधकांकडून होताना दिसला नाही. शिवसेना ठाकरे गटाचा जीव मुंबई महानगर पालिकेत अडकला आहे. यामुळे सहाजिकच त्यांचे सारे लक्ष मुंबई महानगरपालिका निवडणुकीकडे लागले आहे. विधानसभेत अनेक आमदारांना प्रश्न मांडायचे होते. परंतु दिवसभरातील सभागृहातील कामकाजाचे नियोजन सांभाळण्यासाठी विधानसभा अध्यक्षांनी ठराविक वेळ दिला. यात सभागृहातील काही सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. दिवसभरात एकीकडे विधीमंडळाचे कामकाज होत असताना दुसरीकडे मंत्र्यांच्या दालनात महत्त्वपूर्ण बैठकाही होत होत्या. आ. निलेश राणे यांनी वाळू व्यावसायिकांवर होणाऱ्या कारवाई संदर्भात विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. वाळू उत्खननाची महसूलकडून टेंडर काढण्यात येत नाही. वेळीच टेंडर प्रक्रिया पार पाडली जात नाही. आणि उलट तहसीलदारांकडून हप्ते वसूल केले जातात. नाहक त्रास दिला जातो. एकतर अधिकृतपणे प्रक्रिया पार पाडावी किंवा वाळू व्यावसायिकांना चोर म्हणून तरी कारवाई करावी अशी आ. निलेश राणे यांनी सभागृहात मागणी केली. आ. निलेश राणे यांनी कोकणातील शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. अतिवृष्टीत जे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. कोकणातील शेतकऱ्यांना मोठी आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी आ. निलेश राणे यांनी विधानसभेत केली. वैभववाडी -कोल्हापूर रेल्वे मार्ग प्रकल्प होण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी पुढील कार्यवाहीचे आदेश दिल्याची माहिती राज्याचे मत्स्योद्योग व बंदरे विकास मंत्री ना. नितेश राणे यांनी देताना भू संपादनाचे निर्देश मुख्यमंत्री यांनी दिल्याचे विधानसभेत सांगितले. आज दिवसभर विधीमंडळात चर्चा आणि विधानभवनावर विविध मागण्यांसाठी मोर्चा येतच होते.

कोकणातील शेतकऱ्यांसह मच्छीमारांवर होत असलेल्या अन्यायाबाबत आ.निलेश राणे सभागृहात आक्रमक

कोकणातील नुकसानग्रस्त शेतकरी व मच्छीमारांना तातडीने मदत करण्याची केली मागणी

नरेंद्र मोहिते / नागपूर

कोकणातील शेतकऱ्यांसह मच्छीमारांच्या प्रश्नावरून कुडाळ मालवणचे आमदार निलेश राणे यांनी आज आपल्या तडाखेबाज भाषणाने सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. कोकणातील शेतकऱ्यांसह मच्छीमारांना मदत देताना अन्याय होतोय असे सांगताना प्रति हेक्टर मदतीसाठी महाराष्ट्राला एक नियम आणि कोकणाला एक नियम असे का? असा सवाल करतानाच कोकणातील शेतकऱ्यांनाही सरकारने जास्तीत जास्त आर्थिक मदत करावी अशी मागणी आमदार निलेश राणे यांनी केली.

नागपूर येथे राज्य शासनाचे हिवाळी अधिवेशन सुरू असून आमदार निलेश राणे यांनी आज कोकणातील शेतकऱ्यांच्या व मच्छीमारांच्या प्रलंबित प्रश्नांवर विधानसभेचे लक्ष वेधून घेतले. अतिवृष्टीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाई बाबत पुरवणी मागण्यांच्या प्रस्तावावर बोलताना आ. निलेश राणे चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसून आले. ऑक्टोबर महिन्यात कोकणात अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. पुरवणी मागण्यांमध्ये जो नुकसानीचा उल्लेख झालाय तो ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्याचा झालायं पण कोकणात अतिवृष्टी आली ती ऑक्टोबर महिन्यामध्ये व याचा साधा उल्लेखही पुरवणी मागण्यातून करण्यात आलेला नाही. या पुरवणी मागण्यातून महसूल व वनविभाग आमच्याकडे लक्ष देणार आहे का नाही असा प्रश्न करतानाच आ.निलेश राणे

यांनी अतिवृष्टीत कोकणात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट केले. मात्र याची कुठेही नोंद नाही, यामुळे आम्ही कुठे जाऊन मदत मागणार? कोणाकडे बघणार? कोकणामध्ये पाऊसच पडतो अशी समजच झाली असल्याने इथे पैसा गेला काय आणि नाही गेला काय काही फरक पडत नाही. काय निकष लावायचे ते लावा आणि त्या अनुषंगाने कोकणात निकष लावले गेल्याचे आ. निलेश राणे यांनी मुद्देसूदपणे स्पष्ट केले.

कोकणामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये जिरायती शेती होते. भातशेतीही मोठ्या प्रमाणात होते आणि बहुवार्षिक म्हणून आमची नोंद नाही. एनडीआरएफ ज्या नोंद खाली पैसे देते त्याच्यामध्ये साडेबावीस हजार प्रति हेक्टरी मदत महाराष्ट्रात इतर भागात होते. अतिवृष्टीबाबत पंधरा हजार कोटी रुपयांची तरतूद झालेली आहे. मात्र कोकणातील शेतकऱ्यांना मिळालेले पैसे हे प्रति हेक्टरी फक्त ८ हजार ७७७ इतकेच आहेत. हा एकप्रकारे कोकणातील शेतकऱ्याला मदत देताना अन्यायच आहे. प्रति हेक्टरसाठी महाराष्ट्राला एक नियम आणि कोकणाला एक नियम हा भेदभाव कशासाठी असा प्रश्न आ.निलेश राणे यांनी उपस्थित केला. अतिवृष्टीमध्ये आम्ही अधिकाऱ्यांना विचारत होतो, तुम्ही पंचनामे करताय तर त्या पंचनाम्यांमध्ये आपण काय निकष लावताय. तेव्हा त्यांनी महाराष्ट्रामध्ये जो एनडीआरएफ चा निकष आहे तोच आम्ही

(पान २ वर)

वैभववाडी-कोल्हापूर रेल्वेमार्ग राज्य शासन उभारणार

मुख्यमंत्र्यांचा बंदरे विकास मंत्री नितेश राणेंच्या उपस्थितीत आढावा बैठकीत कोकण विकासासाठी महत्वपूर्ण निर्णय

खासदार नारायण राणे यांच्या अथक प्रयत्नांचे फलित

सिंधुदुर्गासह कोकणात, रोजगार, बंदरे विकास, पर्यटन, उद्योगवृद्धीच्या नवीन संधी

पालकमंत्री नितेश राणे यांची विधिमंडळात पत्रकार परिषदेत माहिती

संतोष राऊळ / नागपूर

अवघे कोकण ज्या क्षणाची वाट पाहत होते, तो सोनेरी दिवस अखेर उजाडला आहे. बहुप्रतिक्षित वैभववाडी ते कोल्हापूर रेल्वेमार्ग महाराष्ट्र सरकारमार्फत उभारण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. मत्सव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी गुरुवारी या निर्णयाबाबत विधानसभेत निवेदनाद्वारे माहिती दिली. रत्नागिरी-सिंधुदुर्गचे खासदार नारायण राणे यांनी या रेल्वे मार्गाबाबत केंद्र आणि राज्य सरकारकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता.

या निर्णयाबद्दल नागपूर विधान भवनात माध्यमांशी संवाद साधतना मंत्री नितेश राणे म्हणाले, वैभववाडी

(पान २ वर)

खा. नारायण राणे यांच्या प्रयत्नांना यश - मंत्री नितेश राणे

मंत्री नितेश राणे म्हणाले, या एका निर्णयामुळे महाराष्ट्र आणि कोकण आर्थिक विकासाच्या दिशेने अतिशय गतिमान पद्धतीने वाटचाल करेल. या रेल्वेमार्गासाठी रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचे खासदार नारायण राणे

(पान २ वर)

नाहीतर सरळ वाळू व्यावसायिकांना 'चोर' म्हणून घोषित करावे

आ.निलेश राणे यांनी केली सभागृहात उपरोधिक मागणी

नागपूर (विशेष प्रतिनिधी)

कुडाळ - मालवण विधानसभा मतदारसंघात वाळू व्यावसायिकांवर प्रशासनाकडून होत असलेल्या कारवाईवर सभागृहात आक्रमकपणे भाष्य करताना आ.निलेश राणे यांनी, शासनाने वाळू व्यावसायिकांसाठी योग्य कायदे, नियम तयार करावेत. त्यांना टेंडर काढायला द्यावेत आणि अधिकृत करावे, नाहीतर सरळ वाळू व्यावसायिकांना 'चोर' म्हणून घोषित करावे, असे उपरोधिकपणे सांगितले. ते नागपूर अधिवेशनात बोलत होते.

नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरू असून या अधिवेशनात कुडाळ- मालवण विधानसभा मतदारसंघाचे आमदार निलेश राणे मतदारसंघासह कोकणातील प्रश्नांवर आक्रमकपणे आपले मुद्दे मांडत शासनाचे लक्ष वेधत आहेत. यामध्ये गुरुवारी अधिवेशनात त्यांनी वाळू व्यवसायावर मत मांडले. कुडाळ-मालवण विधानसभा मतदारसंघात

(पान २ वर)

खेड-दापोली मतदार संघातील मत्स्य व किनारपट्टी विकासकामांना मिळणार गती

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी घेतली मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांची भेट

नागपूर (विशेष प्रतिनिधी)

खेड-दापोली मतदारसंघातील महत्त्वाच्या विकासकामांसाठी आज विधानभवन, नागपूर येथे राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांची विशेष भेट घेतली. या भेटीत किनारपट्टी सुरक्षेपासून समुद्र धूप नियंत्रणापर्यंत आणि मच्छिमारांच्या हिताच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर विस्तृत चर्चा करण्यात आली.

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी प्रथम अर्थसंकल्प २०२५ मध्ये समुद्र धूप प्रतिबंधक बांधकामांना मंजुरी देण्याची तातडीची गरज मंत्र्यांसमोर मांडली. आंजर्ले (ता. दापोली, जि. रत्नागिरी) येथील दक्षिणेकडील बाजूस ग्रोयान्स टाईप बंधारा उभारणीसह तद्नुषंगिक कामे त्वरित मंजूर करण्याची मागणी त्यांनी केली. या बांधकामांमुळे किनारी भागातील

(पान २ वर)

लांजा साटवली मार्गावर गोळवशी येथे एसटी -टेम्पो अपघात; ४ जण जखमी

गोळवशी येथील एसटी बस आणि कॅरी टेम्पो यांच्यातील अपघाताची छायाचित्रे

लांजा (प्रतिनिधी)

लांजा आगाराची रूण-लांजा ही एसटी बस आणि टेम्पो या दोन वाहनांमध्ये समोरासमोर अपघात होऊन टेम्पो चालक गंभीर जखमी झाल्याची घटना आज गुरुवारी ११ डिसेंबर रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास लांजा साटवली मार्गावर गोळवशी डंगाचा कोपरा येथे घडली. या अपघातात एसटी आणि टेम्पो दोन्ही वाहनांचे नुकसान झाले असून टेम्पोच्या पुढील दर्शनी भागाचा अक्षरशः चुराडा झाला आहे. स्वतःच्या ताब्यातील टेम्पो हयगयीने चालवून एसटी बसला धडक देत स्वतः सह टेम्पोतील चौघांच्या दुखापतीस कारणीभूत ठरल्याप्रकरणी लांजा पोलिसांनी टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार याबाबतची फिर्याद एसटी बस चालक प्रशांत पांडुरंग यादव (वय ४५ राहणार लांजा कुरूपवाडी) यांनी लांजा पोलीस ठाण्यात दिली आहे. एसटी बस चालक प्रशांत यादव हे आपल्या ताब्यातील रूण-लांजा ही एसटी बस

(पान २ वर)

उद्योजक सचिन उर्फ पिंट्या पाकळे यांच्या दोन कात कारखान्यांवर ईडीची धाड; जिल्ह्यात खळबळ

खेड / चिपळूण (प्रतिनिधी)

रत्नागिरी जिल्ह्यात आज सकाळी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठी आणि महत्त्वपूर्ण कारवाई केली आहे. उद्योजक सचिन उर्फ पिंट्या पाकळे यांच्या सुकीवली

(पान २ वर)



दापोलीत थंडीची मोठी लाट

पारा ६.२ अंशांवर

दापोली (प्रतिनिधी)

मिनी महाबळेश्वर समजल्या जाणाऱ्या दापोलीत पारा दिवसेंदिवस कमी होत आहे. बुधवारी पहाटे किमान तापमान ७.२ अंश सेल्सिअस इतके नोंदले गेले. तर गुरुवारी सकाळी किमान तापमान ६.२ सेल्सिअसने खाली उतरले असून

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या नोंदीनुसार यंदाच्या

(पान २ वर)

कोकणातील हापूस आंब्यालाच मानांकन मिळाले पाहिजे

- वलसाडच्या आंब्याला हापूसचे मानांकन देण्यास आमचा प्रखर विरोध
- आ. शेखर निकम यांनी हिवाळी अधिवेशनात मांडली स्पष्ट भूमिका
- कुंभार्ली घाटातील रस्त्याच्या कामांची चौकशीची केली मागणी

चिपळूण (प्रतिनिधी)

चिपळूण -कराड मार्गावरील कुंभार्ली घाटातील रस्त्याची दुरवस्था, घाटात झालेल्या कामांची चौकशी करण्याबरोबरच कोकणातील हापूस आंब्यालाच मानांकन मिळाले पाहिजे. वलसाडच्या आंब्याला हापूसचे मानांकन देण्यास आमचा प्रखर विरोध आहे, असे ठाम मत आमदार शेखर निकम यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात मांडून कोकणाला न्याय द्यावा, अशी आग्रही मागणी केली. तसेच बांबू लागवड, ॲग्रीस्टॅक योजनेतील अडचणी संदर्भात देखीलआ.

निकम यांनी यावेळी भाष्य केले.

नागपूर येथे राज्य शासनाचे हिवाळी अधिवेशन सुरू असून आमदार शेखर निकम यांनी चिपळूण- संगमेश्वर विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांवर विधानसभेचे लक्ष वेधून घेतले. गुरुवारी त्यांनी कुंभार्ली घाटातील रस्त्याची दुरवस्था तसेच कोकणातील हापूस आंब्यालाच मानांकन मिळण्याबाबत आग्रही

(पान २ वर)